Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ३] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ४-१०, २०२१/माघ १५-२१, शके १९४२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७.

**म.प्रा.नि. व न.र. अधिनियम, १९६६, कलम २१(४क) अन्वये नियुक्त अधिकारी तथा सहसंचालक, नगर रचना, यांजकडून**

**अमरावती शहराच्या प्रारुप विकास योजना अमरावती (दु.सू) मधील महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये फेरबदल/बदलांच्या सूचीचे प्रसिद्धीकरण**

क्रमांक प्रावियो-अम(दु.सू.)-नियुक्त अधिकारी-सहसंचानरअम-१०८-२०२१.—

ज्याअर्थी, अमरावती महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रारुप विकास योजना, अमरावती (दु.सू.) दै. सकाळ (मराठी) व दै. हितवाद (इंग्रजी) मध्ये दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ चे सुचनेद्वारे नागरीकांच्या सुचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात, अमरावती विभागीय पुरवणी, भाग १-अ मध्ये दिनांक ६-१२ डिसेंबर २०१८ रोजी प्रसिद्ध झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहीत मुदतीत प्राप्त सुचना व हरकतींचा विचार करून उक्त अधिनियमाच्या कलम २८(२) नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे दिनांक ०१ ऑगस्ट २०१९ रोजी प्राप्त झाला.

आणि ज्याअर्थी, अमरावती महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३०(१) अन्वये विहीत मुदतीत विकास योजना मंजूरीसाठी शासनास सादर केली नसल्याने सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग अमरावती यांचे आदेश क्र.प्रारुप सु.वि.यो.अम.दु.सु.-नामनिर्देशित अधिकारी नियुक्ती-सहसंचाअम-१३१९ दिनांक २० नोव्हेंबर २०१९ अन्वये सहसंचालक, नगर रचना, अमरावती यांची उक्त अधिनियमाचे कलम-२१(४क) अन्वये नियुक्त केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती नियोजन प्राधिकरण म्हणून वरीलप्रमाणे नियुक्त अधिकारी अमरावती यांनी आवश्यक ते बदल सुचवुन सुधारीत बदलासह अमरावती शहराची प्रारुप विकास योजना (दु.सू.) उक्त अधिनियमाच्या कलम ३०(१) नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

त्याअर्थी उक्त प्रारुप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८(४क) नुसार केलेल्या फेरबदलांची/बदलांची सूची **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे, नागरीकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर फेरबदलांची सुची सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती, अग्रवाल यांची ईमारत, डॉ. जामठे हॉस्पिटल जवळ, कॉंग्रेस नगर रोड, अमरावती या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरीकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

**ह. ज. नाझीरकर,**

अमरावती : म.प्रा.नि. व न.र. अधिनियम, १९६६ कलम २१(४क) अन्वये
दिनांक २० जानेवारी २०२१. नियुक्त अधिकारी तथा सहसंचालक, नगर रचना,
अमरावती विभाग, अमरावती.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८.

## BY OFFICER APPOINTED UNDER SECTION 24(*1a*) OF MRTP ACT, 1966 AND JOINT DIRECTOR, TOWN PLANNING

### PUBLICATION OF LIST OF MODIFICATIONS/CHANGES IN DRAFT DEVELOPMENT PLAN OF AMRAVATI (SECOND REVISION) U/S 28(*4*) OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966

No. Draft D.P.Amt (II$^{nd}$-R)-Appointed officer-JDTP-108-2021.—

Whereas, the Amravati Municipal Corporation, Amravati has being Planning Authority, has published the Draft Development Plan, Amravati (IInd-R) u/s 26 (*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, *vide* notice published in daily Sakal (Marathi) and daily The Hitwada (English) dated 28 November 2018 for inviting suggestions/objections from public. The said notice is published in Maharashtra Government Gazzette of Amravati Division, Supplement Part-1A, dated 6-12 December, 2018.

And whereas, after considering the suggestions/objections to the said Plan received within stipulated period, the Planning Committee constituted u/s 28 (*2*) of the said Act, has submitted its report to the said Planning Authority on date 01 August 2019.

And whereas the Municipal Corporation, Amravati has not submitted the Revised Development plan of Amravati u/s 30 (*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 within the stipulated time. Therefore Joint Director of Town Planning, Amravati by an order प्रारुप-सुवियो-अम-दुसु-नामनिर्देशित अधिकारी नियुक्ती-सहसंचाअम-१३१९ दिनांक २० नोव्हेंबर २०१९ has appointed Joint Director of Town Planning, Amravati to exercise the power of Planning Authority u/s 21 (4a) of MRTP Act, 1966.

And whereas, after discussion on the report submitted by Planning Committee, suggest the changes to the said plan and decided to submit the said Plan for sanction to the Government u/s 30 (*1*) of the said Act, alongwith modifications.

Now, therefore, the list of modification/changes made u/s 28 (*4a*) of the Act, by the said Planning Authority is hereby published as **Appendix "A"** as per the provisions of said act for information of public. The list of the modification/changes is kept open for the inspection of the public in the office of Joint Director, Town planning, Agrawal Building, Near Dr. Jamthe Hospital, Congress Nagar road, Amravati on working days, during office hours.

H. J. NAZIRKAR,

Amravati : Officer Appointed under Section 24(*4a*) of MRTP Act, 1966 And
Dated the 20$^{th}$ January 2021. Joint Director, Town Planning, Amravati Division,
Amravati.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९.

## अध्यक्षा, नगर परिषद, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये चिखली शहराच्या सुधारित विकास योजना आराखड्यात फेरबदल करणेबाबत**

क्रमांक ३५२-२०२१.—

चिखली शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. टीपीएस-२६०५-६११-प्र.क्र.-१०१-२००५-युडी-३० दिनांक १२ जुलै २००५ अन्वये मंजूर झालेली आहे;

त्यात चिखली, नगर परिषदेने सर्वसाधारण सभा दिनांक २७ जानेवारी २०२१ च्या ठराव क्र. ३७ अन्वये शेत सर्व्हे क्र. १६९/२ मधील हरीतक्षेत्र वगळून रहिवाशी क्षेत्रात परावर्तीत करणे बाबत ठराव पारित झालेला आहे.

प्रस्तावित फेरबदल चिखली शहराच्या अंतीम विकास योजना (सुधारीत) आराखड्याच्या भाग नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविण्यांत आलेला आहे. उक्त भाग नकाशा व त्यावरील अहवाल यावर अध्यक्ष, चिखली, नगर परिषद यांनी स्वाक्षरी करून नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ ठेवलेला आहे.

यावरून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) मधील तरतुदींप्रमाणे जाहीर करण्यांत येते की, उक्त फेरबदलांसंबंधी कोणाच्याही काही हरकती व सूचना असतील तर त्यांनी ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झालेपासून ३० (तीस) दिवसांचे आंत अध्यक्ष, चिखली, नगर परिषद, चिखली यांचेकडे लेखी स्वरूपात सादर करावेत म्हणजे सदहू नियोजित फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करते वेळी त्याचा योग्य विचार करण्यांत येईल.

**सौ. प्रिया कुणाल बोंद्रे,**
अध्यक्षा,
नगर परिषद, चिखली.

चिखली :
दिनांक २८ जानेवारी २०२१.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०.

## BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

**Final Development Plan (Revised) of Chikhli Modification under Section 37 (*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No. 352-2021.—

The Final Development Plan (Revised) of Chikhli Town has been sanctioned by Govt. *vide* Govt. Gazette Notification No. TPS-2605-611-CR-101-2005-UD-30, dated 12 July 2005.

Now, Municipal Council, Chikhli had resolved *vide* General Council's Resolution No. 37, Dated 27th January 2021 to convert the land from field Survey No. 169/2 of owner Shri Suresh Appa Waman Appa Khabutre, From Agriculture Zone into Residential Zone.

Proposed Modification is shown in Pink border line on the part of Development Plan of Chikhli and above part plan along with report signed by the President, Municipal Council, Chikhli is kept for public inspection in Municipal Council Office during office hours.

Now, in pursuance of Section 37 (1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. It is hereby notified that any person having any objection or suggestion regarding the proposed Modification may communicate the same in writing to the President, Municipal Council, Chikhli within period of 30 (Thirty) day's from publication of the notification in *Maharashtra Govt. Gazette,* all this objections/ suggestion shall be considered by the Municipal Council before submitting the said Modification to the Govt. for sanction.

SAU. PRIYA KUNAL BONDRE,
President,
Municipal Council, Chikhli.

Chikhli :
Dated the 28th January 2021.

# पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिद्ध झालेली आहे.

## २

**गुरूवार, जानेवारी २८, २०२१ / माघ ८, शके १९४२**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**शुध्दीपत्र**

क्रमांक कक्ष-२०-नविशा-करवप्रशा-आस्था-कावी-८६-२०२१.—

जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्रमांक कक्ष-२०-नपाप्र-निवडणूक-क. प्र.-आस्था-कावी-७७-२०२१, दिनांक २०-०१-२०२१ अन्वये धारणी, नगर पंचायत, जिल्हा अमरावतीची अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ अमरावती विभागीय पुरवणी, दिनांक जानेवारी २१, २०२१/माघ १, शके १९४२ ला पृष्ठ १ ते ७, अनुक्रमांक १ वर प्रसिद्ध झालेली आहे.

सदर प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेमध्ये पृष्ठ क्रमांक ७, प्रभाग क्रमांक १६ मध्ये आरक्षणाची स्थिती ही **सर्वसाधारण महिला** अशी दाखवण्यात आलेली आहे. **याऐवजी** आरक्षणाची स्थिती ही **सर्वसाधारण** अशी वाचावी—

उर्वरित अधिसूचनेमध्ये कोणताही बदल नाही.

अमरावती :
दिनांक २७ जानेवारी २०२१.

**शैलेश नवाल,**
जिल्हाधिकारी, अमरावती.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.